Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - VII JULY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# इंटरनेट आणि माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणारे विद्यार्थी : एक चिकित्सक अभ्यास

**श्रीम. अनिता उत्तमराव चव्हाण**
स.शि.जि.प.मा.शा.आष्टा (ह.ना.)
ता.आष्टी जि. बीड

**१) प्रस्ताविक :-**

विज्ञानाच्या शोधाने प्रगतीची द्वारे खुली झाली, जग जवळ आले तसेच ज्ञानाची क्षितीजे मानव पादाक्रांत करु लागला आहे. इंटरनेट तर अशी जादुची कांडी आहे की, आवश्यक असलेली माहिती क्षणांत घर बसल्या आपण मिळवू शकतो. पूर्वी तरी माहिती मिळवण्यासाठी इंटरनेट कॅफे मध्ये जावे लागत असे, परंतू मोबाईल असे माध्यम आहे ज्यामुळे इंटरनेटच्या साहाय्याने अवघ्या जगाचे दर्शन आता ऐका क्लिकवर सहज उपलब्ध झाले आहे. परंतू आज इंटरनेकडे आणि मोबाईल कडे पाहण्याचा शालेय विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन काय आहे ? हे समजण्यासाठी इंटरनेट आणि माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणारे विद्यार्थी: 'एक चिकित्सक अभ्यास' या संशोधन समस्येची निवड करण्यात आली.

**२) संशोधन समस्येची गरज:-**

१. माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थ्यांचा इंटरनेटकडे पाहण्याचा दृष्टीकोन समजून घेणे.
२. माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थ्यांची इंटरनेट वापरण्याची गरज समजून घेण्यासाठी.
३. माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थी इंटरनेट खरोखरच वापरतात का ? हे समजून घेण्यासाठी.
४. माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थी इंटरनेट कशाप्रकारे वापरतात हे समजून घेण्यासाठी .
५. माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थी शैक्षणिक ॲप्सचा वापर करतात का हे समजण्यासाठी.
६. माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थी खरोखरच इंटरनेटचा वापर करुन शैक्षणिक माहिती मिळवतात का हे समजण्यासाठी .

**३) संशोधन समस्येचे महत्त्व :-** प्रस्तुत संशोधन समस्येचे महत्व पुढील प्रमाणे:-

१. मोबाईल आणि इंटरनेटचे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील स्थान समजेल.
२. माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थी इंटरनेटचा उपयोग अभ्यासात कशा प्रकारे करतात हे समजेल.
३. विद्यार्थी कोणत्या शैक्षणिक ॲप्सचा उपयोग करतात हे जाणून घेता येईल.
४. विद्यार्थी इंटरनेटचा वापर खरोखरच अभ्यासासाठी करत असेल तर तशा शिफारशी सुचवण्यासाठी .
५. विद्यार्थ्यांचा इंटरनेट वापराचा त्यांच्यावर दुष्परिणाम होत असेल तर संभाव्य धोक्यांची सुचना देण्यासाठी .
६. माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थ्यांच्या आवडत्या वेबसाईडस् शोधण्यासाठी.
७. विद्यार्थ्यांना इंटरनेट वापराचा काही शैक्षणिक फायदा होतो काय हे समजण्यासाठी .

**४) संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. विद्यार्थ्यांच्या इंटरनेट वापराचे प्रमाण शोधणे .
२. विद्यार्थ्यांच्या इंटरनेट वापराचे फायदे शोधणे .
३. विद्यार्थ्यांच्या इंटरनेट वापराचे दुष्परिणाम शोधणे.
४. विद्यार्थ्यांना इंटरनेट वापरा संदर्भात शिफारशी सुचविणे.

**५) गृहितके :-**

१. माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थी इंटरनेटचा उपयोग अभ्यासासाठी करतात.
२. विद्यार्थी शैक्षणीक ॲप्सचा वापर करतात.
३. विद्यार्थ्यांकडे इंटरनेट वापराचे अद्यावत ज्ञान आहे.
४. विद्यार्थी इंटरनेटचा वापर शिक्षक आणि पालकांच्या मार्गदर्शनामध्ये करतात.

**६) परिकल्पना :-**

१. विद्यार्थी इंटरनेटचा वापर आवश्यकतेनुसार करतात.
२. विद्यार्थी इंटरनेटच्या मदतीने अभ्यासच करतात.
३. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी इंटरनेट वापरण्यास शाळा प्रोत्साहन देतात.
४. विद्यार्थ्यांना इंटरनेट वापराचा अभ्यासात फायदा होतो.

**७) संशोधन पध्दती :-** प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीमधील सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

**८) संशोधनाचा न्यादर्श व जनसंख्या :-**

प्रस्तुत संशोधनासाठी बीड जिल्हयातील तीन तालुक्यांचा

समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक तालुक्यातील पाच शाळा आणी प्रत्येकी २० प्रमाणे ३०० विद्यार्थी , ३०० पालक आणि त्याच शाळेतील प्रत्येकी २ असे ३० शिक्षक आणि १५ मुख्याध्यापक संशोधनाचा नमुना न्यादर्श म्हणुन निवडले.

**९) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

**१. क्षेत्र व्याप्ती** :- प्रस्तुत संशोधन बीड जिल्ह्यातील आष्टी , पाटोदा व शिरुर या तीन तालुक्यापुरते मर्यादीत आहे.

**२. आशय व्याप्ती** :- प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या इंटरनेट वापराशी संबंधीत आहे.

**३. कालावधी :-** प्रस्तुत संशोधन हे २०१८ ते २०१९ या शैक्षणिक वर्षातील प्राप्त माहितीशी सबंधीत आहेत व ते २०१९ या कालावधीत पुर्ण केले आहेत.

**४. नमुना निवड :-** प्रस्तुत संशोधनासाठी बीड जिल्हयातील आष्टी , पाटोदा व शिरुर तालुक्यातील २० शाळा सहेतुक नमुना निवड पध्दतीद्वारा निवडण्यात आल्या यामध्ये ३०० विद्यार्थी व त्यांचे ३०० पालक त्याच शाळेतील प्रत्येकी २ प्रमाणे ३० शिक्षक व १५ मुख्याध्यापक नमुना म्हणुन निवडण्यात आले.

**१० सांखिकीय परिमाणे :-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक सामग्रीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली साधनाचा उपयोग करण्यात आला. यामध्ये विद्यार्थी प्रश्नावली, पालक प्रश्नावली ,शिक्षक प्रश्नावली आणि मुख्याध्यापक प्रश्नावलीचा सामावेश करण्यात आला. प्रश्नावलीतुन मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी या सांखिकीय परिमाणाचा उपयोग करण्यात आला.

**११) निष्कर्ष :-**

**१. विद्यार्थी प्रश्नावलीचे निष्कर्ष**

१. ९१ % विद्यार्थांच्या घरी मोबाईल आहे ते त्यांचा उपयोग करतात.
२. ५२ % विद्यार्थांना स्मार्ट फोन वापराचे ज्ञान आहे.
३. बहुतांश विद्यार्थांना म्युझिक प्लेयर व इंटरनेट वापरायचे चांगले ज्ञान आहे.
४. ६६ % विद्यार्थी मोबाईल मधील इंटरनेट वापरतात.
५. ७५ % विद्यार्थी इंटरनेटचा उपयोग मनोरंजनासाठी करतात.
६. ६० % विद्यार्थी कधीकधीच शैक्षणीक ॲप्स् वापरतात.
७. ८० % विद्यार्थीनी इंटरनेट वापरा संदर्भात स्वत:वर बंधने घातली नाहीत.

**२. शिक्षक प्रश्नावलीचे निष्कर्ष :-**

१. ३२ % शिक्षक प्रतिसादकांच्या मते इंटरनेट वापराचे विद्यार्थांवर दुष्परिणाम होतो.
२. ७६ % शिक्षकांच्या मते विद्यार्थ्यांचे इंटरनेट वापराचे प्रमाण खुप जास्त आहे.
३. ८० % शिक्षक प्रतिसादकांच्या मते विद्यार्थी अभ्यासासाठी कमी आणि मनोरंजनासाठी जास्त मोबाईल वापरतात.
४. ७५ % शिक्षकांच्या मते विद्यार्थी क्वचितच शैक्षणिक ॲप्स्चा वापर करुन अभ्यास करतात.
५. ८० % शिक्षकांच्या मते विद्यार्थी शैक्षणिक वेबसाईडस् ऐवजी मनोरंजनाच्या वेबसाईडस् जास्त वापरतात.

**२. पालक प्रश्नावलीचे निष्कर्ष :-**

१. ९३ % पालकांनी दैनंदिन गरजेची वस्तू म्हणून मोबाईल घेतला आहे.
२. ६२ % पालकांना मोबाईल मधील इंटरनेट वापराचे ज्ञान आहे.
३. ७३ % पालकांच्या मते घरातील सर्वजन मोबाईल मधील इंटरनेटची सुविधा जास्त प्रमाणत वापरतात.
४. ९५ % पालकांच्या मते मुलं अभ्यास करण्या ऐवजी मोबाईलवर खेळतात.
५. ६४ % पालकांच्या मते मुलांना इंटरनेट सारख्या सुविधा वापरायला द्यायलाच नकोत.

**३. मुख्याध्यापक प्रश्नावलीचे निष्कर्ष :-**

१. ७५ % मुख्याध्यापक ई - लर्निगवर भर देतात.
२. ८० % मुख्याध्यापकांच्या मते विद्यार्थांना मोबाईल देण्यापेक्षा अभ्यासक्रमाच्या सीडीज् दयाव्यात.
३. ६८ % मुख्याध्यापकांच्या मते माध्यमाचा वापर कसा करावा यासाठी समुपदेशन आवश्यक आहे.
४. ७५% मुख्याध्यापकांच्या मते बहुतांश विद्यार्थांच्या घरी अॅड्राँईड मोबाईल आहे आणि ते त्याचा वापर करतातच.
५. ६९ % मुख्याध्यापकांच्या मते विद्यार्थी इंटरनेट मनोरंजन म्हणुन जास्त वापरतात.

**संदर्थ ग्रंथ सुचि:-**

१. जगताप ह.ना.(२०००) शैक्षणीक तंत्रविज्ञान, नुतन प्रकाशन, पुणे
२. मुळे श.रा. आणि उमाठे वि.तु. (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुल तत्वे, विद्याबुक्स प्रकाशन, औरंगाबाद.
३. अतुल कहाते (२९ ऑगष्ट २०१४) तंत्रज्ञानाचा ओव्हरलोड, मनोविकास प्रकाशन, पुणे.